मागास वर्गीयांसाठी राखून ठेवण्यात आलेले रोस्टर बिंदू [पॉईंटस] निर्देशित करुन नमुने तयार नामावली [रोस्टर] ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-मआरवि-१०८९/प्र.क्र.११५/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक- 20 फेब्रुवारी, १९८९.

शासन परिपत्रक :-

शासनाने मागास वर्गीयांच्या पदांचे जे प्रमाण विहित केले आहे व पदोन्नतीसाठी ज्या जागा निश्चित केल्या आहेत त्यासाठी नामावली पाळणे/ठेवणे प्रत्येक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर बंधनकारक आहे. याबाबत शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या खालील आदेशांकडे सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे व विभागीय आयुक्तांचे पुन्हा लक्ष वेधण्यात येत आहे.

[१] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-१०७९/ई-सीआर /जे, दिनांक २३.११.७०

[२] क्रमांक-अेपीटी-१९८४/सीआर ११६/१२, दिनांक २४.५.८४

२. जिल्हा परिषदेच्या विविध कार्यालयात शासकीय विभागाच्या धर्तीवर नामावली [रोस्टर] ठेवण्याबाबतचे आदेश शासनाने संबंधित जिल्हा परिषदांना वेळोवेळी दिलेले आहेत. सदरहू नामावली ठेवण्याबाबतचे आदेश १९७० पासून काटेकोरपणे अंमलात आणण्यात यावेत, अशी मार्गदर्शक सूचना सुद्धा भंडारा जिल्हा परिषदेने हे आदेश पाळले नाहीत असे शासनाच्या निदर्शनास अनुसूचित जाती कल्याण समितीने आणून दिले आहे.

३. प्रत्यक्ष सेवा प्रवेशाद्वारे भरावयाच्या पदांच्या बाबतीत राखून देण्यात आलेला राखीव पदांचा नियम योग्य प्रकारे पाळला जावा यासाठी प्रत्येक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अथवा त्याने प्राधिकृत केलेल्या नियुक्ती अधिकाऱ्याने १०० बिंदू नमुनेवजा नामावली नुसार [ Roster ] रिक्त जागा भरणे आवश्यक आहे.

४. तसेच एखाद्या वर्गात राखीव पदाची संख्या निश्चित करण्यासाठी पदोन्नती देताना मा स्वतंत्र ५० बिंदू रोस्टर [नामावली] ठेवण्याबाबतच्या स्थाई सूचना आहेत. याबाबतचा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी १०७२/१२२/७८/१६, दि.२ मार्च, १९७७ मधील सूचनांकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

५. कोणत्याही सेवा प्रवेशाच्या वेळी मागास वर्गीयांच्या ४ प्रवर्गांपैकी प्रत्येक गटासाठी राखून ठेवावयाच्या रिकाम्या पदांची प्रत्यक्ष संख्या नामावलीतील स्थानांकाद्वारे निश्चित करण्यात यावी, तसेच मागील वर्षाची/वर्षांची अनुशेषाबाबतची पुढे चालू ठेवलेली राखीव पदे विचारात घेण्यात यावी.

६. तथापि, कांही जिल्हा परिषदा शासनाचे हे स्थाई आदेश पाळीत नाहीत असे निदर्शनास आले आहे. सबब शासन याबाबतच्या या आदेशाचा पुर्नरुच्चार करत आहे. याबाबतच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेतील नव्याने स्थापन झालेल्या मागासवर्ग कक्षाची आणि विभागीय आयुक्तांच्या कार्यालयातील मागास वर्ग कक्षाची राहील. जिल्हा परिषदेच्या मागास वर्ग कक्षावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने ते नियंत्रण ठेवावे व शासनाने विहित केलेल्या नमुन्यात एका नोंदवहीमध्ये प्रत्येक कार्यालय ही नामावली ठेवते किंवा कसे याची तपासणी करावी. दोषी अधिकाऱ्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नियमानुसार योग्य ती कडक कारवाई करावी. एखाद्या प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी संबंधित अधिकाऱ्याविरुध्द कठोर कारवाई योजीत नसतील तर/अथवा अशी कारवाई करीत नसतील तर, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना व्यक्तीशः जबाबदार धरण्यांत येईल तसेच त्यांच्या विरुध्द योग्य ती नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

७. नामावली बाबतच्या शासकीय आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही अधिकारी व कर्मचाऱ्यांची गय केली जाणार नाही व त्यांच्या विरुध्द नियमानुसार कारवाई केली जाईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[व्हि. रंगनाथन्]
शासनाचे सचिव.

प्रति,

१] संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

२] आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य,

३] सर्व विभागीय आयुक्त व सर्व जिल्हाधिकारी,

४] सर्व जिल्हा परिषदांचे ...